**"गुणवंत मुलामुलींना कांदळवन व सागरी जैवविविधता या विषयात परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे" योजनेचे निकष व अभ्यासक्रमामध्ये सुधारणा करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - एस-१०/२०२२/प्र.क्र.२९५/फ-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १२ जानेवारी, २०२४.

**वाचा :-** महसूल व वन विभाग, समक्रमांकाचा शासन निर्णय दिनांक २४ मे, २०२३.

**प्रस्तावना:-**

राज्याच्या किनारपट्टी आणि सागरी भागात कांदळवन आणि तेथील जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी पर्यावरणीय व बहुविद्याशाखीय संशोधनास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने राज्यातील गुणवंत मुलामुलींना कांदळवन व सागरी जैवविविधता या विषयात परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर करणे" योजना राज्यात लागू करण्यास मा.मंत्रीमंडळाच्या दिनांक ३/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत मान्यता प्राप्त झाली. त्यानुसार शासन निर्णय दिनांक २४ मे, २०२३ नुसार सदर योजनेची रुपरेषा तसेच अंमलबजावणी बाबत सूचना पारित करण्यात आल्या आहेत. सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाकरीता सदर शिष्यवृत्ती योजनेबाबत प्रचार आणि प्रसिध्दी करण्याकरीता कांदळवन व सागरी जैवविविधता संवर्धन प्रतिष्ठान (कांदळवन प्रतिष्ठान) यांच्याव्दारे मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्दी, महाडीबीटी आणि कांदळवन कक्षाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी तसेच सदर उपक्रमावर कांदळवन प्रतिष्ठानाच्या युट्यूब व इंस्टाग्राम या सोशल मिडिया साईटस वर Short film प्रदर्शित करण्यात येऊन योजनेची प्रसिध्दी करण्यात आली. त्याचप्रमाणे योजनेंतर्गत अर्ज करण्याची मुदत दोन वेळा वाढ करण्यात आली. तथापि, योजनेच्या निकषांनुसार सर्वच अर्जदार अटींची/निकषांची पूर्तता करत नसल्याचे आढळून आले. यास्तव सन २०२३-२४ मध्ये लाभार्थी मिळून आले नाहीत. हे विचारात घेता, प्रस्तूत योजनेच्या निकषांमध्ये तसेच अभ्यासक्रमामध्ये बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र राज्यातील जे गुणवंत विद्यार्थी कांदळवन व सागरी जैवविविधता या तद्नुषंगीक विषयात पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएचडी अभ्यासक्रमासाठी एकूण २५ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी, असा शासनाने निर्णय घेतला आहे. सदर योजनेच्या सद्यस्थितीतील शिष्यवृत्तीची अर्हता/ निकष यामध्ये तसेच अभ्यासक्रमामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

**२.** प्रस्तूत योजनेकरीता शिष्यवृत्तीची सुधारीत अर्हता/निकष खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत:-

महाराष्ट्र राज्यातील जे गुणवंत विद्यार्थी कांदळवन व सागरी जैवविविधता या तद्नुषंगीक विषयात (Earth and Marine Science) पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका, व पीएचडी अभ्यासक्रमासाठी THE (Times Higher Education) Ranking ३00 च्या आतील /किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking 300 च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश घेतील, अशा एकूण २५ विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल.

**३.** प्रस्तूत योजनेचा लाभ प्रदान करण्यासाठी अभ्यासक्रमामध्ये सुधारणा करण्यात येत असून अभ्यासक्रमांची व्याप्ती वाढविण्यात येत आहे. खालील अभ्यासक्रम/शाखांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल.

अभ्यासक्रम/शाखा - Marine Science, Marine Environmental Science, Marine Policy Marine Ecology, Mangrove Ecology, Oceanography, Marine Biology, Marine Fisheries, Marine Bio- Technology, Marine Microbiology, Marine Bio-diversity, Climate Change and Mangrove Biodiversity/Marine Biology, Carbon Sequestration in Mangroves/Marine Ecosystem, Sea level rise in mangroves, Marine/Coastal Management etc.

**४.** सदर योजनेच्या अंमलबजावणी करिता शासन निर्णय दिनांक २४ मे २०२३ मधील अन्य अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल करण्यात येत नसून सदर योजनेकरीता त्या लागू राहतील.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२४०११२१७३८३४१०१९ आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VENUGOPAL REDDY BOLLAVARAM

Digitally signed by VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=97575b20152cd7d6140b21e873943cf8e0b594f98f7d940a604a875057f9a5c5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ADC518D1EC700B3AD7386666A2EAA0C03E0791D886CF553BBCC7819653DDCF29, cn=VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
Date: 2024.01.12 17:37:52 +05'30'

**( बी. वेणुगोपाल रेड्डी )**
**प्रधान सचिव (वने)**
**महसूल व वन विभाग**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री, (वने) यांचे खाजगी सचिव
५. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

६. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधान भवन, मुंबई.
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधान भवन, मुंबई.
८. सर्व सन्माननीय विधानपरिषद / विधानसभा सदस्य.
९. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०.सर्व प्रशासनिक विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव, मंत्रालय, मुंबई.
११.प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१२. प्रधान मुख्य वनसंरक्षक सर्व
१३.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक सर्व
१४.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई/ कार्यकारी संचालक, कांदळवन प्रतिष्ठान
१५.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), पुणे.
१६. मुख्य वनसंरक्षक सर्व
१७.जिल्हाधिकारी सर्व
१८. महालेखापाल लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र १ /२, मुंबई / नागपूर
१९.महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ /२, मुंबई / नागपूर
२०.वनसंरक्षक / उप वनसंरक्षक सर्व
२१.आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२२.आयुक्त, आदिवासी विकास, पुणे.
२३.आयुक्त, कृषी, पुणे.
२४.आयुक्त, मत्स्य व्यवसाय, मुंबई.
२५.संचालक, उच्च शिक्षण, पुणे.
२६.संचालक, आय.आय.टी. पवई, मुंबई.
२७. संचालक, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS)
२८. कुलसचिव, सर्व कृषी व अकृषी विद्यापिठे.
२९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय.
३०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३१. निवडनस्ती कार्यासन फ-३,